# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 21 October 2024

Time: 7.10 to 7.20 AM

Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

**दिनांक: २१ ऑक्टोबर २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

**ठळक बातम्या**

- **विधानसभा निवडणुकीसाठी भाजपकडून ९९ उमेदवारांची पहिली यादी जाहीर–मराठवाड्यातल्या १६ मतदारसंघांचा समावेश–भोकरमधून श्रीजया चव्हाण तर फुलंब्रीतून अनुराधा चव्हाण यांना संधी**
- **मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे यांची विधानसभा निवडणुकीसाठी संमिश्र भूमिका**
- **कळमनुरीचे आमदार संतोष लक्ष्मण बांगर यांच्याविरोधात आचारसंहिता भंगाचा गुन्हा**
- **कृषी उत्पादनांचा भाव आणि किरकोळ विक्री किंमतीतली तफावत कमी करण्यासाठी समिती स्थापन करण्यात येणार**

**आणि**

- **महिला टी–ट्वेंटी विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत न्यूझीलंड अजिंक्य–बंगळुरू कसोटीतही न्यूझीलंडचा आठ गडी राखून विजय**

**सविस्तर बातम्या**

विधानसभा निवडणुकीसाठी भारतीय जनता पक्षाने ९९ उमेदवारांची पहिली यादी काल जाहीर केली. यामध्ये मराठवाड्यातल्या १६ मतदारसंघांचा समावेश आहे. नांदेड जिल्ह्यात किनवट इथून भीमराव केराम, भोकर – श्रीजया अशोक चव्हाण, नायगाव – राजेश पवार, तर मुखेड विधानसभा मतदारसंघातून तुषार राठोड यांना उमेदवारी देण्यात आली आहे. हिंगोली मतदारसंघातून तान्हाजी मुटकुळे,

जिंतूर – मेघना बोर्डीकर, परतूर – बबनराव लोणीकर, बदनापूर – नारायण कुचे, तर भोकरदन मतदारसंघातून संतोष दानवे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातल्या फुलंब्री मतदारसंघातून अनुराधा चव्हाण,
औरंगाबाद पूर्व – अतुल सावे, तर गंगापूर विधानसभा मतदारसंघातून प्रशांत बंब यांना उमेदवारी देण्यात आली आहे. केज मतदारसंघातून नमिता मुंदडा,
 निलंगा – संभाजी पाटील निलंगेकर, औसा – अभिमन्यू पवार, आणि तुळजापूर विधानसभा मतदारसंघातून राणा जगजितसिंह पाटील निवडणूक लढवणार आहेत.
याशिवाय नागपूर दक्षिण – पश्चिम मतदारसंघातून देवेंद्र फडणवीस,
कामठी – चंद्रशेखर बावनकुळे, जामनेर – गिरीश महाजन, शिर्डी– राधाकृष्ण विखे पाटील, मुंबईत मलबाद हिल मधून मंगलप्रभात लोढा, तर कुलाबामतदार संघातून राहुल नार्वेकर यांना उमेदवारी देण्यात आली आहे.

****

दरम्यान, विधानसभा निवडणुकीसाठी उद्या २२ ऑक्टोबरपासून उमेदवारी अर्ज स्वीकारले जातील. २९ ऑक्टोबरपर्यंत उमेदवारी अर्ज भरण्याची मुदत असून अर्जांची छाननी ३० ऑक्टोबर रोजी होणार आहे. तर ४ नोव्हेंबरपर्यंत उमेदवारी अर्ज मागे घेता येणार आहेत.

****

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे पाटील यांनी विधानसभा निवडणुकीसाठी संमिश्र भूमिका जाहीर केली आहे. काल आंतरवाली सराटी इथं झालेल्या मराठा समाजाच्या बैठकीत त्यांनी ही भूमिका विशद केली. ज्या मतदारसंघात निवडून येण्याची शक्यता आहे, तिथं उमेदवार उभे करावेत, अनुसूचित जाती जमातीसाठी राखीव मतदार संघात मराठा आरक्षणाला समर्थन देणाऱ्या उमेदवाराला मतदान करावं आणि जिथे आपला उमेदवार उभा नसेल, तिथे जो उमेदवार बॉण्डपेपरवर आपल्या मागण्यांना समर्थन देईल, त्या उमेदवाराला मतदान करण्याचा निर्णय जरांगे यांनी जाहीर केला.

****

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाची काल मुंबईत बैठक झाल्याचं वृत्त आहे. दरम्यान, आमदार आदित्य ठाकरे यांनी काल मुंबईत ज्येष्ठ नेते शरद पवार यांची भेट घेतली. ही भेट महाविकास

आघाडीच्या जाहीरनाम्या संदर्भात होती असं ठाकरे यांनी भेटीनंतर वार्ताहरांशी बोलताना सांगितलं.

****

दिवंगत आमदार विनायक मेटे यांच्या पत्नी ज्योती मेटे यांनी काल मुंबईत आपल्या प्रमुख कार्यकर्त्यांसह राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश केला. यावेळी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार यांच्यासह प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे उपस्थित होते. बीड विधानसभेसाठी आपण पक्षाकडे प्रस्ताव दिला असून, संघटनेच्या सामाजिक कार्याला राजकीय जोड देण्यासाठी हा निर्णय घेतल्याचं ज्योती मेटे यावेळी म्हणाल्या.

विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर इतरही अनेक पक्षांचे नेते पक्षांतर करत आहेत.

*Byte…*

**माजी आमदार कपिल पाटील यांनी काल काँग्रेस पक्षात प्रवेश केला. दिल्ली इथं काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे, महाराष्ट्र प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या उपस्थितीत हा पक्षप्रवेश झाला.**

**

**नंदूरबार जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष भरत गावित यांनी काल राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. पक्षाचे अध्यक्ष अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष खासदार सुनिल तटकरे यांनी त्यांचं पक्षात स्वागत केलं.**

**

**वंचित बहुजन आघाडीचे माजी पश्चिम विदर्भ अध्यक्ष डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला. मुंबई इथं पक्षाचे अध्यक्ष उद्धव ठाकरे यांच्या उपस्थितीत हा पक्ष प्रवेश सोहळा पार पडला. देवळे यांनी यावर्षीच्या लोकसभा निवडणुकीनंतर वंचित बहुजन आघाडीतील आपल्या पदाचा आणि पक्षाच्या प्राथमिक सदस्यत्वाचा राजीनामा दिला होता.**

**

**बीड इथले भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी काल *भारतीय जंतापक्षातुन* बाहेर पडत असल्याचं काल जाहीर केलं. *आपली* पुढची राजकीय दिशा लवकरच स्पष्ट करु, असं मस्के यांनी सांगीतलं आहे.**

****

बीड जिल्ह्यात सहाही विधानसभा सार्वत्रिक निवडणूक मतदार संघात मतदान यंत्रांचं प्रथमस्तरीय संगणकीकृत सरमिसळ काल करण्यात आली. यावेळी दोन हजार ८९७ बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट आणि तीन हजार १३८ व्हीव्हीपॅटचं वाटप विधानसभा मतदार संघांना करण्यात आलं.

****

लातूर इथंही काल ही प्रक्रिया पार पडली, जिल्ह्यात ६ विधानसभा मतदारसंघातील २ हजार १४२ मतदान केंद्रांसह एका सहाय्यकारी मतदान केंद्रावर मतदान होणार आहे.

****

हिंगोली जिल्ह्यातील कळमनुरी विधानसभेचे आमदार संतोष लक्ष्मण बांगर यांनी आदर्श आचारसंहितेचा भंग केल्याच्या कारणावरून कळमनुरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १८ ऑक्टोबर रोजी कळमनुरी इथं कार्यकर्त्यांना संबोधित करताना मतदारांना आमिष दाखवण्याचा प्रयत्न त्यांच्या वक्तव्यातून झाल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी गणेश बोथीकर यांच्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणी उपविभागीय अधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी भुत्ते यांनी बांगर यांना कारणे दाखवा नोटीस बजावली होती.

****

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी आकाशवाणीवरुन प्रसारित होत आहे. या कार्यक्रमात आज ठाणे जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

****

कृषी उत्पादनं आणि बागायती उत्पादनांचा शेतकऱ्यांना मिळणारा भाव आणि या उत्पादनांची बाजारातली किरकोळ विक्री किंमत यातली तफावत कमी करण्यासाठी सरकार एक समिती स्थापन करण्यात येणार आहे. केंद्रीय कृषीमंत्री शिवराज सिंह चौहान यांनी काल नवी दिल्लीत एका कृषी परिषदेत ही माहिती दिली. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्याचं काम ही समिती करणार असल्याचं त्यांनी सांगितलं. कृषी संशोधनाचे फायदे प्रयोगशाळेपासून शेतापर्यंत पोहोचवण्यासाठी पुढच्या महिन्यापासून 'कृषी चौपाल' उपक्रमाचा प्रारंभ केला जाणार असल्याची माहिती चौहान यांनी दिली.

****

दिवाळी आणि छटपूजा या सणांसाठी उत्तर आणि पूर्वेकडच्या राज्यांकडे जाणाऱ्या प्रवाशांची गर्दी लक्षात घेऊन मध्य रेल्वेनं ५७० विशेष फेऱ्या जाहीर केल्या आहेत. मुंबई, पुणे आणि नागपूरसह विविध ठिकाणांहून या फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. १३२ फेऱ्या मुंबईहून, तर १४६ फेऱ्या पुण्याहून निघणार आहेत. तर १०८ फेऱ्या लातूर, सावंतवाडी, नागपूर, पुणे, कोल्हापूर, नांदेड आणि इतर ठिकाणी पोचणार आहेत. दक्षिणेकडच्या करीमनगर, कोचुवेली, काझिपेट आणि बेंगळुरूसाठी ८४ फेऱ्यांची व्यवस्था करण्यात आली आहे.

****

महिला टी-ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक स्पर्धेत न्यूझीलंड संघानं विजेतेपद पटकावलं आहे. काल दुबईमध्ये दक्षिण आफ्रिकेसोबत झालेल्या अंतिम सामन्यात न्यूझीलंडने प्रथम फलंदाजी करत २० षटकात ५ बाद १५८ धावा केल्या, उत्तरादाखल दक्षिण आफ्रिकेचा संघ ९ बाद १२६ धावाच करु शकला. न्यूझीलंडची अमेलिया कीर ही सामनावीर आणि मालिकावीर ठरली.

****

बंगळूरु कसोटीत न्यूझीलंडनं भारतावर आठ गडी राखून विजय मिळवत, तीन सामन्यांच्या मालिकेत एक-शून्य अशी आघाडी घेतली. पहिल्या डावात अवघ्या ४६ धावा करणाऱ्या भारतीय संघानं, दुसऱ्या डावात उभारी घेत न्यूझीलंडवर वर्चस्व गाजवलं होतं. मात्र, ३५६ धावांची पिछाडी भरून काढल्यावर भारतीय फलंदाजांना आव्हानात्मक धावसंख्या उभारण्यात अपयश आलं. विजयासाठी ठेवलेलं १०७ धावांचं माफक आव्हान पाहुण्या संघानं केवळ दोन फलंदाजांच्या मोबदल्यात पार केलं.

****

परभणी इथं कालपासून राज्यस्तरीय शालेय कुस्ती स्पर्धांना सुरुवात झाली. जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे आणि महानगरपालिका आयुक्त धैर्यशील जाधव यांच्या हस्ते या स्पर्धेचं उद्घाटन झालं.

१४ वर्षाखालील मुले मुली यांच्यातल्या या तीन दिवसीय स्पर्धेत एकूण २०० खेळाडू सहभागी झाल्याचं क्रीडा अधिकारी कविता लावंदे यांनी सांगितलं

****

लातूर जिल्ह्यात, सध्याच्या सणाच्या काळात भाडेवाढ करणाऱ्या खाजगी वाहतूकदारांकडून वाजवीपेक्षा जास्त प्रवासी भाडे आकारल्यास प्रवाशांनी त्याची तक्रार करावी, यासाठी प्रादेशिक परिवहन विभागाच्या ई-मेल सुविधेचा वापर करावा असं आवाहन विभागीय प्रादेशिक परिवहन अधिकारी विनोद चव्हाण यांनी केलं आहे.

****

छत्रपती संभाजीनगर येथील विश्व हिंदू परिषदेच्या अंतर्गत  येणाऱ्या मंदिर अर्चक पुरोहित आसामच्या वतीने काल शहरातील धार्मिक परिसरात स्वच्छता अभियान राबवण्यात आलं. या अभियानात शहरातील विविध संस्था, संघटना तसंच उपासना मंडळाचे १६०० पदाधिकारी सहभागी झाले होते.

****

नांदेड जिल्ह्यात दोन दिवसात अतिवृष्टीची नोंद झाली. काल सकाळी अप्पर मानार धारणाचे पाच तर विष्णुपुरी प्रकल्पाचा एक दरवाजा उघडला आहे. यंदा १०६ पूर्णांक ९३ टक्के पावसाची नोंद झाली असून, पावसानं सरसरी ओलांडल्याचं वृत्त आहे.

****